# प्रसिध्दीपत्रक

## यवतमाळ जिल्हा पोलीस घटक, पोलीस भरती २०२४-२०२५

## शुध्दीपत्रक

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- अनाथ-०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक- २३ ऑगष्ट २०२१ वाचावे. त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

**२ अटी व शर्ती/कार्यपध्दती :-**

१) अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील.

२) पदभरती अथवा शैक्षणीक प्रवेशासाठीची अनाथ आरक्षणाची पदे खुला किंवा सामाजीक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येऊ नयेत.

३) अनाथांसाठी आरक्षीत पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवाराचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

तथापी यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ चे जाहीरातीमध्ये एकुण जागेच्या १% **अनाथ** आरक्षणाची **०१ जागा** ही खुला (Open) प्रवर्गामध्ये अनावधानाने दर्शविण्यात आलेली आहे. त्यामध्ये तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करतांना **अनाथ** १% आरक्षण असणा-या जागेबाबत शासन निर्णय दिनांक- २३ ऑगष्ट २०२१ नुसार कार्यवाही करण्यात आलेली असून, अंतिम निवड यादी व अंतिम प्रतिक्षा यादी प्रसिध्द करतांना नमूद शासन निर्णयाप्रमाणेच कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत उमेदवार यांनी नोंद घ्यावी.

करीता पोलीस शिपाई पदाचे जाहिरातीमध्ये खुला प्रवर्गामध्ये कप्पीकृत आरक्षणानुसार **सर्वसाधारण** जागा **१५** ऐवजी **१६** असे वाचावे.

दिनांक:- ०८/०४/२०२६
ठिकाण :- यवतमाळ

**( कुमार चिंता ) भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**



Scanned with OKEN Scanner